**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे प्रकरण २२ अन्वये.**

**संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ५५२/२०२६**

**निशाणी क्र..........**

**संक्षीप्त संपरिक्षण केलेला अभिलेख –**

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | अपराध घडल्याचा दिनांक | : | ०२/०३/२०२६ |
| **२.** | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | ०२/०३/२०२६ |
| **३.** | फिर्यादीचे नाव, त्याच्या आई व वडिलांचे नाव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान ईत्यादी | : | महाराष्ट्र शासनतर्फे पोलीस स्टेशन, सावनेर. |
| **४.** | आरोपीचे नाव, त्याच्या आई व वडिलांचे नाव, त्याचे वय व त्याचे निवासस्थन ईत्यादी | : | **संदिप राधेशाम धुर्वे**, वय – ३२ वर्ष, रा. – वार्ड क्र.०२, परसोडी, खानगाव, ता. सावनेर, जि. नागपूर. |
| **५.** | ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावुन सांगण्यात अपराध आरोपीला समजावुन सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | : | **मोटर वाहन अधिनीयमाचे कलम १८५ व १३०/१७७ अन्वये**. |

तुम्ही दिनांक ०२/०३/२०२६ रोजी १८.३० वाजेच्या सुमारास गांधी चौक, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपुर येथे तुमच्या ताब्यातील वाहन क्र. एमएच–४०–एजी–०२९१ हे वाहन दारुचे सेवन करून दारुचे नशेत चालविताना मिळून आले आणि त्याव्दारे तुम्ही, कलम १८५ मोटर वाहन अधिनीयम खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे आणि म्हणुन मी तुमच्यावर कलम १८५ मोटर वाहन अधिनीयमच्या कायद्यानुसार अभियोग चालविण्याचा आदेश देत आहे.

उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन हे विना लायसन्स चालविताना मिळून आले आणि त्याव्दारे तुम्ही, कलम १३०/१७७ मोटर वाहन कायद्याखाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे आणि म्हणून मी तुमच्यावर कलम १३०/१७७ मोटर वाहन अधिनीयमच्या कायद्यानुसार अभियोग चालविण्याचा आदेश देत आहे.

प्रश्न क्र.१ :– तुम्हाला पोलीस नकला मिळाल्या काय ?

उत्तर :– होय.

प्रश्न क्र.२ :– तुमचेवर ठेवलेला आरोप तुम्हाला समजला काय ?

उत्तर :– होय.

प्रश्न क्र.३ :- तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर :- होय.

प्रश्न क्र.४ :- तुम्हाला सरकारतर्फे मोफत सल्लागार पाहिजे काय ?

उत्तर :- नाही.

..................

**आरोपीची सही.** समक्ष,

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH Date: 2026.05.09 13:45:11 +0530

(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)

**सावनेर.** **पॅनल प्रमुख, राष्ट्रीय लोक अदालत,**

दिनांकः ०९/०५/२०२६ सावनेर, जिल्हा नागपूर.

**साक्षीपुराव्याबाबत अधिटिपण्या –**

आरोपीने आपला गुन्हा कबुल केला आहे व आरोपीने तो आपल्या स्वेच्छेने कबुल केला आहे. आरोपीला गुन्हयाचे परिणाम समजावुन सांगितलेले आहे. आरोपीचा पहिला गुन्हा असल्यामुळे त्याने दंड आकारतांना दयेची विनंती केलेली आहे. अपराधाचे स्वरुप व इतर बाबी विचारात घेवुन माझ्या मते खालील शिक्षा ही न्यायोचीत राहील. म्हणुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.** आरोपीला मोटर वाहन अधिनीयम कलम १८५ च्या कायद्याप्रमाणे दोषी ठरवुन १०,०००/- रुपये (रुपये दहा हजार फक्त) दंड ठोठाविण्यात येत आहे आणि दंड न भरल्यास १५ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागले असे आदेशीत करण्यात येत आहे.

**२.** आरोपीला मोटर वाहन अधिनीयम कलम १३०/१७७ च्या कायद्याप्रमाणे दोषी ठरवुन २००/- रुपये (रुपये दोनशे फक्त) दंड ठोठाविण्यात येत आहे आणि दंड न भरल्यास ७ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागेल असे आदेशीत करण्यात येत आहे.

**३.** आरोपी हे सहा महिन्यांकरीता वाहन चालविण्यास असमर्थ आहे असे मोटर वाहन कायद्याचे कलम २० (१) (२) अन्वये त्यांच्या लायसन्स बाबत जाहीर करण्यात येते. सरकारी पक्षाने याची नोंद घ्यावी.

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH Date: 2026.05.09 13:45:16 +0530

(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)

**सावनेर.** **पॅनल प्रमुख, राष्ट्रीय लोक अदालत,**

दिनांकः ०९/०५/२०२६ सावनेर, जिल्हा नागपूर.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P. D. F. File of order is word to word as per original order."

Name of Stenographer : S. A. Misal